# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिक्षक/प्रशासकीय कर्मचा—यांसाठी असलेल्या निवासस्थान वाटपाबाबतचे सुधारित नियम खालीलप्रमाणे —

१. शिक्षक/प्रशासकीय कर्मचा—यांच्या वर्गवारीप्रमाणे निवासस्थानांचे वाटप तयार केलेल्या प्रतिक्षा यादीतील क्रमांकानुसारच केले जाईल. याबाबत निवासस्थान वाटप समितीने आग्रही रहावे.

२. शिक्षकांच्या निवासस्थानांचे वाटप खालीलप्रमाणे केले जाईल —

अ. प्राध्यापक निवासस्थाने रिकामी झाल्यास ती निवासस्थाने जे प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक किंवा सहा.प्राध्यापक निवासस्थानात रहात असतील त्यांना कॅम्पस सिनिऑरिटी प्रमाणे प्राध्यापक निवास वाटप करण्यात येईल/बदलून देण्यात येईल.

ब. वरील कारणांमुळे सहयोगी प्राध्यापक निवासस्थान रिकामे झाल्यास सदरचे निवासस्थान सहा. प्राध्यापक निवासस्थानात रहात असलेल्या सहयोगी प्राध्यापक यांना कॅम्पस सिनिऑरिटीप्रमाणे वाटप करण्यात येईल.

क. वरील कारणांमुळे किंवा इतर कारणांमुळे सहा. प्राध्यापक निवासस्थान रिकामे झाल्यास ते निवासस्थान प्रतिक्षा यादीवरील शिक्षकांपैकी जे शिक्षक असे निवासस्थान स्वीकारण्यास तयार असतील त्यांचा हुद्दा लक्षात न घेता निवासस्थान मागणीच्या अर्जाच्या ज्येष्ठतेप्रमाणे वाटप करण्यात येईल.

ड. वरील वाटपाप्रमाणे सहा. प्राध्यापक निवासस्थान जर प्राध्यापक किंवा सहयोगी यांना वाटप करण्यात आले तर संबंधित शिक्षकाने निवासस्थान ताब्यात घेताना त्यांच्या हुद्दयानुसार निवासस्थान मिळण्यासाठी त्वरित अर्ज करणे आवश्यक असेल.

३. वाटप केलेले निवासस्थान संबंधित शिक्षकाने/प्रशासकीय कर्मचा—याने कार्यालयीन आदेश मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत ताब्यात घेण्याचे आहे. तसे न केल्यास निवासस्थानाची आवश्यकता नाही असे समजून त्यांचा क्रम प्रतिक्षा यादीतून वगळण्यात येईल/प्रतिक्षा यादीत शेवटी घेतला जाईल व प्रतिक्षा यादीतील पुढील क्रमांकातील शिक्षक/प्रशासकीय कर्मचा—यांना संबंधित निवासस्थानाचे वाटप केले जाईल.

४. शिक्षक/प्रशासकीय कर्मचा—यांच्या निवासस्थानातील प्रत्येक वर्गवारीतील एकूण निवासस्थानापैकी दहा टक्के निवासस्थाने मागासवर्गीय कर्मचा—यांना आणि दहा टक्के महिलांसाठी राखून ठेवण्यात आली आहेत. रिकाम्या होणा—या निवासस्थांचे वाटप करताना त्या त्या वर्गवारीत एकूण दहा टक्के वाटप मागासवर्गीय कर्मचा—यांना झाले आहे अगर कसे याचा विचार करुन प्रतिक्षा यादीप्रमाणे वाटप केले जाईल. मागासवर्गीय सेवक व महिला यांच्या स्वतंत्रा प्रतिक्षा याद्या तयार करुन क्रमानुसार निवासस्थान वाटप केले जाईल.

५. निवासस्थान वाटप करताना खालील कर्मचा—यांच्या बाबतीत उपलब्ध असलेली प्रतिक्षा यादी विचारात न घेता अग्रहक्काने निवासस्थानाचे वाटप केले जाईल . अत्यावश्यक प्रशासकीय वर्ग खालीलप्रमाणे —

१. वैद्यकीय अधिकारी
२. रेक्टर व लेडीज वॉर्डन
३. उपकुलसचिव/सहा.कुलसचिव — परीक्षा विभाग व आस्थापना विभाग
४. अभियंता/कनिष्ठ अभियंता किंवा आवेक्षक (ओव्हर सिअर) प्रत्येकी एक परंतु जास्तीत जास्त दोन
५. सुरक्षा अधिकारी आणि सहा.सुरक्षा अधिकारी आणि वर्ग—४ मधील दहा टक्के निवासस्थाने चौकीदारासाठी
६. स्टाफ नर्स
७. प्लंबर
८. वायरमन
९. वाहन चालक
१०. कुलगुरु बंगल्यातील खानसामा

उपरोक्त कर्मचा—यांना दिली जाणारी निवासस्थाने संबंधित कर्मचारी/ अधिकारी यांनी त्या त्या पदावरुन बदली झाल्यानंतर तीन महिन्यांच्या मुदतीत सोडण्याची आहेत.

६. शिक्षक/प्रशासकीय कर्मचारी विद्यापीठ निवासस्थानात रहातात, त्यांनी जर कोल्हापूर महानगरपालिका हद्दीत स्वत:च्या अथवा कुटुंबियांच्या मालकीचे निवासस्थान बांधले/विकत घेतले तर त्यांनी सदरचे निवासस्थान ताब्यात घेतल्यापासून दोन महिन्याच्या आत विद्यापीठ निवासस्थान सोडण्याचे आहे. अशा प्रशासकीय कर्मचा—यांची सेवा अत्यावश्यक आहे असे मा.कुलगुरुंना वाटल्यास सदरची मुदत आणखी काही महिने वाढवून दिली जाईल.

७. ज्या शिक्षक/प्रशासकीय कर्मचा—यांपैकी पती—पत्नी दोन्हीही विद्यापीठ सेवेत असतील अशाना दोहोपैकी एकाच कर्मचा—याला निवासस्थान दिले जाईल. तथापि ते कायदेशीररित्या विभक्त झाल्यास स्वतंत्ररित्या निवासस्थान देण्याचा विचार केला जाईल.

८. प्रशासकीय कर्मचारी त्यांच्या वर्गापेक्षा कनिष्ठ वर्गातील कर्मचा—यासाठीच्या निवासस्थानात रहात असेल तर त्या कर्मचा—याला त्याच्या वर्गातील निवासस्थान मिळण्याबाबत विनंती केल्यास त्या तारखेला त्याचे नाव त्या वर्गातील प्रतिक्षा यादीत समाविष्ठ केले जाईल व त्याप्रमाणे रिकाम्या होणा—या निवासस्थानाचे वाटप केले जाईल.

९. एकाच वर्गातील शिक्षक/प्रशासकीय सेवकांना त्यांची निवासस्थाने स्वेच्छेने बदलून देण्याबाबत विनंती करता येईल. त्याबाबत अंतिम निर्णय निवासस्थान वाटप समितीचा राहील.

१०. शिक्षक/प्रशासकीय कर्मचारी परसेवेवर (लीनवर) दुस—या संस्थेत गेल्यास त्याला त्याच्याकडे असलेले निवासस्थान त्याच्या लीन पिरियडपर्यंत आवश्यक असल्यास ठेवता येईल. त्यानंतर त्याला ते सोडावे लागेल. लीनवर इतर ठिकाणी जाणा—या सेवकाला/शिक्षकाला स्वत:चे निवासस्थान स्वत:च्या कुटुंबियाव्यतिरिक्त अन्य कोणास वापरण्यास देता येणार नाही.

११. एखाद्या शिक्षक/प्रशासकीय कर्मचा—यांस निवासस्थान वाटप झाल्यानंतर तो त्याचा गैरवापर (दुस—यास रहाण्यास जागा देणे, शेजा—यांबरोबर भांडणतंटा करणे, नशापान करुन शेजा—यांना त्रास होईल असे वागणे, विनापरवाना वृक्षतोड करणे इ. कारणासाठी जागेचा वापर करणे असे करीत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याला देण्यात आलेले निवासस्थान काढून घेण्याचा हक्क कार्यालयाकडे राखून ठेवण्यात आला आहे.

अ. निवासस्थानाचा वापर किंवा निवासस्थानातील वीज व पाणी याचा वापर कोणत्याही स्वरुपाच्या व्यवसायासाठी, उद्योगासाठी स्वत: वापर केल्यास अथवा इतरास करु दिल्यास संबंधित कर्मचा—यांवर दंडात्मक कारवाई केली जाईल व त्याचे निवासस्थान काढून घेण्याचा अधिकार विद्यापीठास राहील

ब. पाणी टंचाईचा विचार करता व पाणी बिलात झालेली वाढ लक्षात घेता पाण्याच्या वापरावर योग्य ते नियंत्राण ठेवण्याच्या दृष्टीकोनातून वीज मिटरप्रमाणे पाण्याचे मिटरही प्रत्येक निवासस्थानात बसविण्याची व्यवस्था अभियांत्रिकी विभागाकडून करण्यात येईल. तसेच महानगरपालिकेस ज्या दराने पाण्याचे बिल आदा केले जाते त्याच दराने परिसरातील पाण्यासाठी दर आकारणी करण्यात येईल. प्रचलित दराप्रमाणे आकारणी होईल.

१२. अ. शिक्षक/प्रशासकीय कर्मचा—याने निवृत्ती/स्वेच्छा निवृत्ती घेतली असल्यास त्या कर्मचा—यास त्याच्याकडे असलेले निवासस्थान त्याने अथवा त्याच्या कुटुंबियाने तीन महिन्याच्या आत सोडण्याचे आहे. जर त्याने या काळात मुदतवाढीसंदर्भात विनंती केल्यास मुदतवाढीसाठीचे कारण संयुक्तिक वाटल्यास आणखी मुदतवाढ देण्याचे अधिकार मा.कुलगुरुंना असतील.

ब. शिक्षक/प्रशासकीय कर्मचा—यांचा मृत्यू, बडतर्फी अथवा अन्य कारणाने सेवा समाप्ती झाल्यास त्या शिक्षकाला/कर्मचा—याला दिले असलेले निवासस्थान तीन महिन्याच्या आत सोडण्याचे आहे. जर या काळात मुदतवाढीसंदर्भात विनंती केल्यास आणखी मुदतवाढ देता येईल व त्याचे अधिकार मा.कुलगुरुंना रहातील. मुदतवाढीतील घरभाडे आकारणी पहिल्या फक्त तीन महिन्यासाठी सवलतीच्या दरात करण्यात येईल. जर उपर्निदिष्ट मुदतवाढीच्या कालावधीत निवासस्थान रिकामे केले नाही तर ते अनधिकृत वास्तव्य समजण्यात येऊन नियमाप्रमाणे चालू बाजारभाव दराने घरभाडे आकारणी केली जाईल. तसेच संबंधित निवासस्थानाचा ताबा कार्यालय सक्तीने घेईल व याबाबत ज्या काही कायदेशीर बाबी उद्भवतील त्याची सवस्वी जबाबदारी त्या संबंधितावर/कर्मचा—याच्या कुटुंबियावर राहील.

क. निवासस्थानात राहणा—या आपल्या कुटुंबियाकडून शेजारील कुटुंबियांना कोणत्याही प्रकारचा उपद्रव होणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक आहे. तसे आढळल्यास संबंधित दोषी असणा—या कर्मचा—याचे निवासस्थान काढून घेण्यात येईल.

ड. विद्यापीठ निवासस्थानात रहाणा—या शिक्षक/प्रशासकीय कर्मचा—यांनी निवासस्थानातील बल्ब, टयूब्ज बदलणे आवश्यक असेल तेंव्हा स्वखर्चाने बदलण्याचे आहेत.

इ. परिसरातील निवासस्थानात रहाणा—या शिक्षक/प्रशासकीय कर्मचा—यांनी पाळीव प्राणी/पक्षी पाळण्याचे नाहीत.

१३. अ. निवासस्थानात रहाणा—या कर्मचा—यांनी कार्यालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय निवासस्थानात कोणत्याही स्वरुपाचा परस्पर बदल करु नये.

ब. निवासस्थान वाटप समितीमध्ये किमान एक किंवा दोन महिला प्रतिनिधी असाव्यात.

१४. विद्यापीठ परिसरात राहत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांच्या विनंतीनुसार घरगुती कार्यक्रमासाठी येणाऱ्या पाहूण्याची राहण्याची सोय करणेकरिता रिक्त निवासस्थान उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच सदर निवासस्थान ''जसे आहे तसे'' या तत्वावर वापराबाबत त्यांचेकडून प्रति दिनी रु. १००/— याप्रमाणे ''क्वार्टर रेंट'' म्हणून भरुन घेण्यात यावे. तसेच सदर निवासस्थान जास्ती जास्त ०७ दिवसापर्यत वापरण्यास देण्यात यावे.

१५. एनसीसी कॅम्पसाठी येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी ''जसे आहे तसे'' या तत्वावर वापराबाबत त्यांचेकडून प्रति दिनी प्रत्येक विद्यार्थ्यास रु. १०/— याप्रमाणे ''क्वार्टर रेंट'' म्हणून भरुन घेऊन निवासस्थान उपलब्ध करुन देण्यात यावे.